स्थापना : १९२०

रजि. नं. २९६६

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

द्वारा – पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे १.

## ६८ वा

# वार्षिक अहवाल व ताळेबंद

सन १९८७-८८

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि,

द्वारा–पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे–१.

## ६८ वा वार्षिक अहवाल

**मा. अध्यक्ष व सभासद बंधू आणि भगिनींनो,**

आपल्या सोसायटीचा सन १९८७-८८ या सहकारी वर्षाच्या कामकाजाचा अहवाल व ३० जून १९८८ रोजी संपलेल्या वर्षाची हिशेबाची पत्रके कार्यकारी मंडळाच्या वतीने सादर करतांना मला आनंद होत आहे.

अहवाल सालात संस्थेनें केलेल्या कामकाजाची कल्पना सोबत जोडलेल्या संस्थेच्या आर्थिक हिशेब पत्रकावरून येईलच. सभासदांच्या आर्थिक अडचणी जास्तीतजास्त प्रमाणात सोडविण्यासाठी संस्थेने कर्जाचा पुरवठा विनाविलंब व तातडीनें सभासदांना केलेला आहे. संस्थेच्या कार्यकारी मंडळाने संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टीने व सभासदांचे हितासाठी नेहमी चांगले निर्णय घेऊन संस्था प्रगतीपथावर आणलो आहे. आपल्या संस्थेची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस भक्कम होत असल्याचे आपणांस संस्थेच्या आर्थिक पत्रकावरून दिसून येईल. संस्थेच्या आर्थिक प्रगतीत सभासदांचा, पोलीस खात्यातील अधिकारी व सेवकवर्गांचा फार मोठा वाटा आहे, याचाही मला फार मोठा अभिमान वाटतो. संस्थेची तपशीलवार माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे देत आहे.

**सभासद :**

अहवाल साल आरंभी ५२२४ सभासद पटावर होते. अहवाल सालात ६८४ नवीन सभासद झाले असून १३३ सभासदांचे सभासदत्व सेवानिवृत्ती, राजीनामे, मृत्यू, बदली या कारणाने कमी होऊन अहवाल सालअखेर सभासद संख्या ५,७७५ इतकी झालेली आहे.

**भाग भांडवल :**

अहवाल साल आरंभी संस्थेचे भाग भांडवल रु. ७३,१२,३२०।–एवढे होते. चालू वर्षी मासिक वर्गणी व रोख शेअर्स खरेदीमुळे भाग भांडवलात भर पडून सालअखेर भाग भांडवल रु. १,१२,७९,९६० एवढे झालेले आहे.

**राखीव निधी व इतर निधी :**

मागील सालच्या नफा वाटणीतून व प्रवेश फीच्या रुपाने अहवाल सालात रु. २,०५,७३४-९६ रिझर्व्ह फंडाची भर पडून ३०-६-८८ अखेर रिझर्व्ह फंडाची रक्कम रु. ६,७५,९७३-८५ एवढी झालेली असून इतर निधीची रक्कम साल अखेरीस रु. १,९२,४८२-६७ एवढी झालेली आहे.

**बँक कर्ज :**

सभासदांना वेळेवर कर्ज उपलब्ध व्हावे म्हणून संस्थेने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे कडून कॅश क्रेडिट कर्ज घेतले असून दि. ३०-६-८८ अखेर संस्थेस रु. ८८,९९,३४८-७६ कर्ज बँकेस देणे आहे.

**ठेवी :**

अहवाल साल आरंभी संस्थेत रु. ३,०२,५३९-०० च्या ठेवी जमा होत्या. अहवाल सालात त्यात वाढ होऊन सालअखेर सभासदांच्या रु. ५,०९,४३४-९० च्या ठेवी जमा आहेत. आपली संस्था इतर संस्था व बँकांपेक्षा ठेवीवर जास्त व्याज देते व ठेवीवर दर सहामाहीस व्याज देण्यात येते. शिवाय ६६ महिन्यात पुनर्गुंतवणूक (दामदुप्पट) योजनाही संस्थेने सुरू केलेली आहे. व्याजदराचा तक्ता अहवालाचे शेवटी दिलेला आहे.

संस्थेच्या ठेवीची योजना अतिशय चांगली असून जास्तीत जास्त सभासदांनी या योजनेचा फायदा संस्थेत ठेव गुंतवून घ्यावा. तसेच पोलीस खात्यातून निवृत्त होणाऱ्या परंतु सभासद नसलेल्या सेवकांसाठीही संस्थेने ठेव योजना राबविण्याचे ठरविले आहे. त्याचाही फायदा सभासदांनी घ्यावा.

**गुंतवणूक :**

संस्थेने सालअखेरीस पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत शेअर्समध्ये रु. १४,२५,०००।– ची गुंतवणूक केली असून रिझर्व्ह फंड, सेवक भविष्य निधी, सेवक ग्रॅच्युईटी निधी व इतर निधीमध्ये रु. ८,२०,०००।– ची मुदत ठेवीत गुंतवणूक केलेली आहे,

**सभासद कर्ज :**

अहवाल सालात संस्थेनें २,२०२ सभासदांना रु. १,८६,५७,५००।– चे कर्जवाटप केले असून अहवालसालात कर्जवसुली रु. १,२०,२३,४७०।– एवढी झाली असून दि. ३०-६-८८ अखेर सभासदांकडून रु. २,०४,६५,४७५।– कर्जबाकी येणे आहे.

**थकबाकी :**

आपल्या संस्थेचे अहवाल साल अखर एकूण ६० सभासदांकडून रु. ९९,८७५।– कर्जाची थकबाकी येणे आहे. सभासदांच्या परजिल्हयात बदल्या, आस्कमिक मृत्यू, बडतर्फी, पगार तहकुबी, सेवानिवृत्ती व खात्यातून कमी केल्यामुळे सभासदांकडून थकीत कर्जबाकी येणे दिसत आहे. संस्था थकबाकी वसुलीसाठी अत्यंत प्रयत्नशील असून संबंधितांशी पत्रव्यवहार चालू आहे. बऱ्याच थकबाकीदारांकडून संपूर्ण कर्जवसुलीही मिटींग अखेर झालेली आहे. अहवालसाली थकबाकीचे प्रमाण ०.४८टक्के आहे. यात मुदतीबाहेर गेलेली एकही कर्जबाकीची केस नाही.

**हिशोब तपासणी**

संस्थेची ३०-६-८७ अखेरची सरकारी हिशोब तपासणी मा. आर. जे. पंजवानी, लेखापरीक्षक यांनी केली असून संस्थेस 'अ' वर्ग मिळाला आहे. तसेच संस्थेची अंतर्गत हिशोब तपासणी मे. जी. एम. काकडे अँड कं. यांनी केलेली असून त्याचाही अहवाल सोबत जोडलेला आहे.

**आदर्श पोटनियम (मॉडेल बायलॉज)**

संस्थेने सरकारी हिशोब तपासणीसांचे शेऱ्यानुसार व पूर्वीचे पोटनियमात सुसंगती व सुधारणा व्हावी म्हणून सहकारी खात्याने स्वीकृत केलेले 'आदर्श पोटनियम' तयार केले असून तेही आपल्या माहितीसाठी व मंजुरीसाठी आपल्यासमोर सादर केलेले आहेत. काही उपविधीत दुरुस्त्या सुचविल्या आहेत. त्याही परिशिष्ट 'अ'मध्ये दिल्या असून त्यासही मंजुरी द्यावी.

**संस्थेचे कामकाज :**

अहवाल सालात झालेल्या व्यवहारातून सभासदांना दिलेल्या कर्जावरील व्याज, गुंतवणुकीवरील व्याज व लाभांश इ. रूपाने सोसायटीस मिळालेल्या उत्पन्नातून बँक कर्जावरील व्याज, सभासद ठेवींवरील व्याज, दैनंदिन व्यवस्थापन खर्च इ. खर्च वजा जाता निव्वळ नफा रु. १३,६५,३०३-९७ एवढा झालेला आहे. संस्थेच्या नफ्यात लक्षणीय वाढ झाली असून संस्थेने याही वर्षी सभासदांना १२ टक्केप्रमाणे लाभांश देण्याची शिफारस केलेली आहे. संस्थेच्या कार्यकारी मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी द्यावी असे वाटते.

**आभार व समारोप :**

अहवालसालात संस्थेच्या अध्यक्षांनी वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन केलेले आहे. त्याबद्दल मी व संस्थेचे संचालक मंडळ त्यांचा आभारी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील वसुलीशी संबंधित असलेली सर्व कार्यालये, पोलीस स्टेशन्स यांच्या कर्मचारी वृंदाकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल संस्थेच्या वतीने संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे. व यापुढेही त्यांनी असेच सहकार्य करावे अशी अपेक्षा संचालक मंडळ करीत आहे.

मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी वर्गानेही संस्थेस सहकार्य केले आहे, त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. तसेच पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन, संचालक मंडळ, अधिकारी व जिल्हा परिषद शाखा अधिकारी व बँकेतील इतर सेवकांनी संस्थेस वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

तसेच संस्थेचे सन १९८७ अखेरचे सरकारी हिशोब तपासणी करणारे अधिकारी व सेवक वर्ग यांनीही केलेल्या सहकार्याबद्दल व मार्गदर्शनाबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. तसेच संस्थेचे अंतर्गत हिशोब तपासणीस मे. जी. एम. काकडे अँड कं.चे मालक व त्यांचे सहकारी यांनीही केलेल्या सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा संस्थेच्या वतीने आभारी आहे,

संस्थेच्या चेअरमनपदाची जवाबदारी पार पाडत असताना संस्थेचे व्हा. चेअरमन, संचालक व सभासद तसेच संस्थेचे सेक्रेटरी व इतर कर्मचारी वर्गाने दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार मानून संस्थेचा अहवाल पूर्ण करीत आहे.

**ए. बी. कारखानीस**
**चेअरमन**
दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑ.
क्रेडिट सो. लि. पुणे.

## दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. पुणे १. (५

जमा नांवे पत्रक-दि. १।७।१९८७ ते दि. ३०।६।८८ चे

| जमा (तपशील) | रुपये पैसे | नावे (तपशील) | रुपये पैसे |
|---|---|---|---|
| सभासद शेअर | ४१,९३,५९०-०० | सभासद शेअर | २,२५,९५०-०० |
| गंगाजळी निधी | २,०५,७३४-९६ | सभासद प्रवेश फी | ३,४४५-०० |
| सभासद प्रवेश फी | ३,४४५-०० | बँक ओव्हर ड्राफ्ट | ४,५२,९४३-०० |
| सोसायटी महोत्सव निधी | १०,०००-०० | बँक कॅश क्रेडिट | १,८३,२९,५६७-७५ |
| सोसायटी इमारत निधी | २०,०००-०० | सभासद मुदत ठेव | ८८,८००-०० |
| सेवक ग्रॅच्युइटी निधी | १०,०००-०० | थकबाकी व्याज तरतूद | १३,६२५-७५ |
| सेवक भविष्य निधी | १४,३४१-२३ | सभासद ठेव व्याज देणे | ३४,६५२-९६ |
| लाभांश समीकरण निधी | २५,०००-०० | सेवक ठेव व्याज देणे | ३६६-६५ |
| बँक ओव्हरड्राफ्ट | ४,२२,७५०-४६ | सभासद लाभांश देणे | ५,४२,०९१-०० |
| बँक कॅश क्रेडिट | २,०७,९३,०४९-१७ | कार्यकर्त्यांना मानधन देणे | १०,९७१-८६ |
| सेवक मुदत ठेव | १४,४५८-५७ | शेअर अनामत देणे | २,९८९-४० |
| सभासद मुदत ठेव | २,९५,६९५-९० | जादा कर्जवसुली देणे | १,४५०-०० |
| थकबाकी व्याज तरतूद | २९,२३०-०० | अनामत देणे | १,२५,२९,५५१-०० |
| सभासद ठेव व्याज देणे | ३९,३३९-६१ | ऑडीट फी देणे | ७,९७२-०० |
| सेवक ठेव व्याज देणे | ९१६-६५ | सभासद शेअर वर्गणी | ४२,१०,१८५-०० |
| सभासद लाभांश देणे | ५,४५,२६३-४० | सहकार शिक्षण निधी | ५००-०० |
| कार्यकर्त्यांना मानधन देणे | १३,२००-०० | सेवक बोनस देणे | २०,३८६-१४ |
| शेअर अनामत देणे | ५,५४३-४० | सेवक व्यवसाय कर | १,६७७-०० |
| जादा कर्जवसुली देणे | १,७००-०० | धर्मदाय निधी | ८००-०० |
| अनामत देणे | १,२५,२६,०५९-२० | नफातोटा खाते | ८,१२,९६१-१६ |
| ऑडीट फी देणे | १०,५००-०० | बँक सेव्हिंग्ज | ३०-९५ |
| सभासद शेअर वर्गणी | ४२,११,३३०-०० | बँक सेव्हिंग्ज | ७,०२४-०० |
| सहकारी शिक्षण निधी | ५००-०० | बँक सेव्हिंग्ज | ८-१५ |
| सेवक बोनस देणे | २५,०४३-०० | बँक शेअर्स | ४,७७,५००-०० |
| सेवक व्यवसाय कर | १,९५४-०० | बँक मुदत ठेव | २,१३,५००-०० |
| धर्मदाय निधी | ८००-०० | सभासद कर्ज | १,८६,५७,५००-०० |
| बँक मुदत ठेव | ६,०००-०० | सेवक ठेव तारण कर्ज | ६,१९८-७४ |
| सभासद कर्ज | १,२०,२३,४७०-०० | सभासद ठेव तारण कर्ज | ५८,७८०-७० |
| सभासद ठेव तारण कर्ज | ७,६०५-०० | सभासद कर्ज व्याज येणे | २,८३,७००-०० |
| सभासद कर्ज व्याज येणे | १,८६,२४२-०० | बँक ठेव व्याज येणे | २३,१०३-२० |
| बँक ठेव व्याज येणे | १७,६०९-२५ | अनामत येणे | ११,३२०-०० |
| अनामत येणे | ११,२०५-०० | लायब्ररी खाते | ६५-०० |
| सेवक पगार उचल | १,६८०-०० | सेवक पगार उचल | १,८००-०० |
| बँक ओव्हर ड्राफ्ट व्याज देणे | ५३-०० | फर्निचर व डेड स्टॉक | ८,२९९-५० |
| फर्निचर व डेड स्टॉक | ३,३१६-७९ | फॉर्म व पुस्तके शिल्लक | ८,३१८-५० |
| फॉर्म व पुस्तके शिल्लक | ६,२५१-१५ | खर्च बाबी नफातोटा पत्रकाप्रमाणे | १३,०४,३३०-७२ |
| उत्पन्नबाबी नफातोटा पत्रकाप्रमाणे | २६,६९,६३४-६९ | अखेरची शिल्लक | १,०८३-६० |
| आरंभीची शिल्लक | ६४७-३० | | |
| एकूण रुपये | ५,८३,५३,२४८-७३ | एकूण रु. | ५,८३,५३,२४८-७३ |

**रा. सो. शिर्के**
सेक्रेटरी

**ज्ञा. मा. झुरंगे**
व्हा. चेअरमन

**ए. बी. कारखानीस**
चेअरमन

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., पुणे. द्वारा—पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे-४११००१.

## रोजीचा ताळेबंद

दि. ३० जून १९८८

### भांडवल व देणे

| सन १९८७ अखेर रुपये पैसे | तपशील | | ३०-७-१९८८ अखेर रुपये पैसें |
|---|---|---|---|
| | **भाग भांडवल-** | | |
| ३,००,००,०००-०० | **(अ) अधिकृत भाग भांडवल** | | ३,००,००,०००-०० |
| | अधिकृत भाग भांडवल रु. १० चा एक याप्रमाणे एकूण ३०,००,००० भाग | | |
| ७३,१२,३२०-०० | **(ब) वसूल भाग भांडवल** | | १,१२,७९,९६०-०० |
| | वसूल भाग भांडवल रु. १०।- चा एक याप्रमाणे एकूण ११,२७,९९६ भाग | | |
| | **गंगाजळी व इतर निधी** | | ८,६८,४५६-५२ |
| ४,७०,२३८-८९ | १) गंगाजळी निधी | ६,७५,९७३-८५ | |
| २६,०००-०० | २) इमारत निधी | ४६,०००-०० | |
| २०,०००-०० | ३) संशयित बुडित कर्ज निधी | २०,०००-०० | |
| १०,०००-०० | ४) लाभांश समीकरण निधी | ३५,०००-०० | |
| २,८८९-९६ | ५) महोत्सव निधी | १२,८८९-९६ | |
| २०,०००-०० | ६) सेवक ग्रॅच्युइटी निधी | ३०,०००-०० | |
| ३४,२५१-४८ | ७) सेवक भविष्य निधी | ४८,५९२-७१ | |
| | | ८,६८,४५६-५२ | |
| | **मुदत ठेवी** | | ५,४१,२४१-०० |
| ३,०२,५३९-०० | १) सभासद मुदत ठेवी | ५,०९,४३४-९० | |
| १७,२५७-५३ | २) सेवक मुदत ठेवी | ३१,८०६-१० | |
| | | ५,४१,२४१-०० | |
| | **कर्जे** | | ८९,५०,७२१-७९ |
| ६४,३५,८६७-३४ | १) पुणे जि. म. स. बँक, मर्या. कॅश क्रेडिट | ८८,९९,३४८-७६ | |
| ८१,५६५-५७ | २) पुणे जि. म. स. बँक, मर्या. ओव्हर ड्राफ्ट | ५१,३७३-०३ | |
| | | ८९,५०,७२१-७९ | |
| | **इतर देणीं व तरतुदी** | | १ २१,६५९-०३ |
| १३ ६२५-७५ | १) थकबाकी व्याज तरतूद | २९,२३०-०० | |
| १०,७००-४० | २) सभासद मुदत ठेव व्याज | १५,३८७-०५ | |
| १,४७,५७,२५५-९२ | पुढील पानावर | | २,१७,६२,०३८-३४ |



### जिंदगी व येणी

| सन १९८७ अखेर रुपये पैसें | तपशील | | ३०-६-१९८८ अखेर रुपये पैसें |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक** | | ८,९२२-७३ |
| ६४७-३० | १) रोख शिल्लक | १,०८३-६० | |
| ५५६-५७ | २) पुणे जि. म. स. बँक मर्या., सेव्हिंग खाते | ५८७-५२ | |
| ७१-७१ | ३) पुणे जि. म. स. बँक मर्या. सेव्हिंग (भविष्य निधी) | ७,०९५-७१ | |
| १४७-७५ | ४) पुणे जि. म. स. बँक मर्या. सेव्हिंग (ग्रॅच्युइटी निधी) | १५५-९० | |
| | | ८,९२२-७३ | |
| | **गुंतवणूक** | | २२,४५,०००-०० |
| ९,४७,५००-०० | पुणे जि. म. स. बँक, मर्या., शेअर्स | १४,२५,०००-०० | |
| ४,६५,०००-०० | पुणे जि. म. स. बँक, मर्या., गंगाजळी निधी | ६,७२,५००-०० | |
| ३७,५००-०० | पुणे जि. म. स. बँक, मर्या. सेवक भविष्य निधी | ३७, ००-०० | |
| १,००,०००-०० | पुणे जि. म. स. बँक, मर्या., मुदत ठेव | १,००,०००-०० | |
| १,००,०००-०० | पुणे जि. म. स. बँक, मर्या., सेवक ग्रॅच्युइटी निधी | १०,०००-०० | |
| | | २२,४५,०००-०० | |
| | **कर्जे** | | २,०५ २८,४५४-४४ |
| १,३८,३१,४४५-०० | १) सभासद सर्वसाधारण कर्ज | २,०४,६५,४७५-०० | |
| ५,६०५-०० | २) समासद ठेव तारण कर्ज | ५६,७८०-७० | |
| | ३) सेवक ठेव तारण कर्ज | ६,१९८-७४ | |
| | | २,०५,२७,४५४-४४ | |
| | **व्याज येणे** | | ३,०६,८०३-२० |
| १,८६,२४२-०० | १) समासद कर्ज व्याज (पैकी थकलेले २९,२३०-००) | २,८३,७००-०० | |
| १७,६०९-२५ | २) बँक मुदत ठेवीवरील व्याज | २३,१०३-२० | |
| | | ३,०६,८०३-२० | |
| १,५६,०२,३२४-५८ | पुढील पानावर | | २,३०,८९,१८०-३७ |

**रोजीचा ताळेबंद** **जिंदगी व येणी**

| सन १९८७ अखेर रुपये पैसे | तपशील | | ३०–६–१९८८ अखेर रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १,५६,०२,३२४–५८ | मागील पानावरून | | २,३०,८९,१८०–३७ |
| | **मालमत्ता** | | ३८,७४८–९३ |
| २५,२८३–३२ | १) फर्निचर व डेड स्टॉक | ३०,२६६–०३ | |
| ९९–४० | २) लायब्ररी | १६४–४० | |
| ६,२५१–१५ | ३) फॉर्म्स व छपाई | ८,३१८–५० | |
| | | ३८,७४८–९३ | |
| | **इतर येणे** | | ५४१–३० |
| ६६–३० | १) अनामत येणे | १८१–३० | |
| २४०–०० | २) सेवक पगार उचल | ३६०–०० | |
| | | ५४१–३० | |
| १,५६,३४,२६४–७५ | एकूण रुपये | | २,३१,२८,४७०–६० |

| | | |
|---|---|---|
| **रा. सो. शिर्के** | **ज्ञा. मा. झुरुंगे** | **ए. बी. कारखानीस** |
| सेक्रेटरी | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

**– संचालक मंडळ –**

श्री. गो. ग. चिटणीस — श्री. कृ. ग. जगताप

श्री. द. सो. कोरे — श्री. ए. रा. भाटे

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., द्वारा-पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे ४११००१



दि. ३० जून १९८८ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक

खर्च

| १९८७ अखेर | तपशील | | ३०-६-८८ अखेर रुपयें |
|---|---|---|---|
| | **दिलेले व्याज** | | ९,९० २१७ |
| ५,७५,८५९-०१ | अ) बँक कॅश क्रेडिटवर | ९,२६,५४९-१७ | |
| ९,३२५-९० | ब) बँक ओव्हर ड्राफ्टवर | ७,७५८-५५ | |
| १९,५७७-४७ | क) समासद मुदत ठेवीवर | ४८,०८९-११ | |
| १,२५७-५३ | ड) सेवक मुदत ठेवीवर | ३,४६५-२२ | |
| ३,५२०-१२ | इ) सेवक भविष्य निधीवर | ४,३५५-२३ | |
| | | ९,९०,२१७-२८ | |
| | **सेवक पगार व भत्ते** | | २,१४,७३५-० |
| १,४३,९६०-९७ | अ) सेवक पगार व भत्ते | १,७४,६९९-०० | |
| २०,३८६-१४ | ब) सेंवक बोनस तरतूद | २५,०४३-०० | |
| ४,२८७-०० | क) सेवक भविष्य निधी वर्गणी | ४,९९३-०० | |
| २४ ०७८-४० | ड) सेवक ग्रॅच्युइटी निधी तरतूद | १०,०००-०० | |
| | | २,१४,७३५-०० | |
| | **इतर खर्च व तरतुदी** | | ७०,१४८-४४ |
| ८५००-०० | हिशोब तपासणी फी | १०,५००-०० | |
| ५००-०० | सहकार शिक्षण फंड | ५००-०० | |
| १५०-०० | सोसायटी व्यवसाय कर | १५०-०० | |
| २,८०७-६१ | फर्निचर डेड स्टॉक घसारा | ३,३१६-७९ | |
| ५००-०० | जाहिरात खर्च | १,४९०-०० | |
| --- | कार्यकारिणी निवडणूक खर्च | २१,९८७-१० | |
| ३,५५०-०० | कार्यकारिणी सभा भत्ता | ६,९७५-०० | |
| १५,४६९-१५ | फॉर्म छपाई, स्टेशनरी | १२,४८५-१५ | |
| २,३३१-०० | टपाल खर्च | ४,३०३-०० | |
| ७,७२१-१५ | तसलमात खर्च | ६,१०५-२० | |
| ८८५-२० | मेहनताना खर्च | २,३३६-२० | |
| | | ७०,१४८-४४ | |
| १३ ६२५-७५ | थकबाकी व्याज तरतूद | | |
| १०,०००-०० | संशयित व बुडित निधी | | २९,२३०-०० |
| २,००१-०० | सानुग्रह अनुदान | | —— |
| ८,०९,१५९-८५ | निव्वळ नफा | | —— |
| | | | १३,६५ ३०३-१७ |
| १६ ७९,४५३-२५ | एकूण रुपये | | २६,६९,६३४-६९ |

उत्पन्न

| ३०-६-८७ अखेर रुपये पैसें | तपशील | | ३०-६-८८ अखेर रुपये पैसें |
|---|---|---|---|
| | **मिळालेले व्याज** | | २६,०५,९७३-९४ |
| १५,८२,४९८-८५ | अ) सभासदांकडून कर्जावरील व्याज | २५,२३,५१८-४५ | |
| ६२,२९०-२३ | ब) बँक मुदत ठेवीवरील व्याज | ८०,२५२-९५ | |
| १४७-३२ | क) सेव्हिंग्ज खात्यावरील व्याज | १०१-१० | |
| २३४-५० | ड) समासद ठेव तारण कर्ज व्याज | १,९०२-७० | |
| --- | इ) सेवक ठेव तारण कर्ज व्याज | १९८-७४ | |
| १,२६८-३५ | ई) मुदत ठेव (कॉसमॉस बँक) | | |
| | | २६,०५,९७३-९४ | |
| २८ ६८६-०० | बँक शेअर्सवरील लाभांश | | ५५,६४४-७५ |
| ४,०५३-०० | फॉर्म विक्री | | ७,६४६-०० |
| २७५-०० | दाखला फी | | ३७०-०० |
| १६,७९,४५३-२५ | एकूण रुपयें | | २६,६९,६३४-६९ |

तपासले- आमच्या याच तारखेच्या अहवालानुसार बरोबर आहे.

जी. एम. काकडे अँड कं. चार्टर्ड अकौंटंट

रा सो. शिर्के, सेक्रेटरी — ज्ञा. मा. झुरंगे, व्हाईस चेअरमन — ए. बी. कारखानीस, चेअरमन

संचालक मंडळ : श्री. वि. श्री. नाईक, श्री. श. र. शेख, श्री. शि. ना. घुले, श्री. ज. का. शिलेदार, श्री. गो. ग. चिटणीस, श्री. कृ. ग. जगताप, श्री. ए. रा. भाटे, श्री. द. सो. कोरे

# The Poona District Police Co-operative Credit Society Limited, Pune - 411 001.

## INTERNAL AUDITOR'S REPORT

I have audited the enclosed BALANCE SHEET of the Poona District Police Co-operative Credit Society Limited Pune - 411 001, as on 30th June, 1988 and its PROFIT AND LOSS ACCOUNT for the period from 1st July 1987 to 30th June 1988 and report that,

1. I have obtained all the information and explanations, which to the best of my knowledge and belief, were necessary for audit carried out by me.

2. In my opinion, proper books of Accounts as required by the M. C. S. Act, 1960, Rules made thereunder and the byelaws of the Society have been kept by the Society so far as it appears from the examination of these books.

3. The Balance Sheet and the Profit & Loss Account examined by me are in agreement with the books of accounts and returns of the Society.

4. In my opinion and to the best of my information and according to the explanations given to me and as shown by the books of the society and subject to the observations contained in my audit memo of even date, the said accounts give all the information required by the M. C. S. Act 1960 and the Rules made thereunder in the manner so required and give a true and fair view.

1. In the case of the Balance Sheet of the State of affairs of the society as on 30th June 1988,

2. In the case of the Profit and Loss Account, of the profit of the society for the year ended 30th June 1988.

Pune

Date : 27/9/1988.

Shri. G. M. KAKADE
M/s. G. M. KAKADE & Co.
Chartered Accountant

| सध्याचा उ. वि. क्र. | सध्याच्या उपविधीची शब्दयोजना | सुधारित उपविधीची शब्दयोजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| ३९ अ | कार्यकारी मंडळ ज्या सभासदाची पोलीस खात्यामध्ये तीन वर्षे नोकरी पूर्ण झाली असेल त्याला रु.१०,००० (दहा हजार) फक्त इतक्या कमाल रकमेपर्यंत कर्ज मंजूर करू शकेल. अशा कर्ज मंजूर झालेल्या प्रत्येक सभासदाने कर्ज मंजूर रकमेच्या एक दशांश इतक्या किमान रकमेचे शेअर्स धारण करणे आवश्यक आहे. | कार्यकारी मंडळ ज्या सभासदाची पोलीस खात्यामध्ये तीन वर्षे नोकरी पूर्ण झाली असेल त्याला रु. १५,००० (पंधरा हजार फक्त) इतक्या कमाल रकमेपर्यंत कर्ज मंजूर करू शकेल. अशा कर्ज मंजूर झालेल्या प्रत्येक सभासदाने अर्ज मंजूर रकमेच्या एक दशांश इतक्या किमान रकमेचे शेअर्स धारण करणे आवश्यक आहे. | सभासदाची कर्ज फेडण्याची मर्यादा वाढल्यामुळे व सभासदांचे मागणीवरून |
| ४० | सर्वसाधारणपणे कर्जफेडीची मुदत १ ते ४० हप्त्यात राहील. | सभासदाची कर्ज फेड रु. १० हजार पर्यंत ३६ हप्त्यात तर रु. १० हजाराचे पुढील कर्जाची फेड ४८ हप्त्यात केली जाईल. | सभासदांना कर्ज फेडण्यासाठी सोय व्हावी म्हणून |
| ४१ | कर्ज हमी पत्र नियम (वैयक्तिक तारणावर दिल्या जाणाऱ्या कर्जासंबंधीचे नियम) क्रमांक १ ते १७ | कर्जे सभासदाच्या वैयक्तिक जामिनकीवर व कायम स्वरुपाच्या नोकरीतील दोन सभासदांच्या जामीनकीवर देण्यात येतील. कोणाही सभासदास तीन कर्जदार सभासदांपेक्षा अधिक सभासदास जामीन राहता येणार नाही. | सभासदांचे मागणीवरून |
| ५० | नवीन | मासिक वर्गणी– प्रत्येक सभासद द. म. १००/– रुपयेप्रमाणे मासिक वर्गणी संस्थेस जमा करील. सहकारी वर्षाअखेरीस सदरची मासिक वर्गणीचे शेअर्समध्ये रुपांतर करण्यात येईल. जमा झालेल्या मासिक वर्गणीच्या रकमेवर प्रचलित बचत खात्याच्या दराने व्याज कट मिती पद्धतीने देण्यात येईल. वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर डिव्हिडंडचे रकमेबरोबर व्याज देण्यात येईल. | संस्थेच्या भाग भांडवलात वाढ होणे आवश्यक असल्यामुळे तरतूद करण्यात आली आहे |
| ४८ (ब) ७ | नवीन | सभासद कल्याण निधी : दर वर्षाच्या नफा वाटणीतून सभासद कल्याण निधी बाजूला काढण्यात येईल. सदरचा 'सभासद कल्याण निधी' एखादा सभासद मयत झाल्यास त्याच्या वारसाला रु. २५०/– (दोनशे पन्नास) प्राथमिक खर्चासाठी ताबडतोब मदत देण्यात येईल. | सभासदांच्या हितासाठी |
| ८ (ह) | नवीन | नाममात्र सभासद : (१) जी व्यक्ती संस्थेची सभासद नाही, मात्र पोलीस खात्यातून निवृत्त झालेली असेल व सदर व्यक्तीस संस्थेकडे मुदत ठेवीत रक्कम गुंतवायची असेल तर अशा व्यक्तीस संस्थेने विहित केलेल्या नमुन्यात प्रवेश अर्ज भरून रुपये ५।– ( पाच ) ( विनापरतीची ) भरून संस्थेचे नाममात्र सभासद होता येईल.<br>(२) संस्थेच्या कर्मचाऱ्यांनाही नाममात्र सभासद होता येईल.<br>(३) नाममात्र सभासदास भाग दाखला, लाभांश मिळणेचा, मतदान करणे, संस्थेची आर्थिक पत्रकें पाहणे अथवा संस्थेचे वार्षिक सर्वसाधारण सभेस अगर विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे व त्यात भाग घेणे हे अधिकार राहणार नाहीत. | सभासदांना सेवानिवृत्त झाल्यानंतर ठेवी ठेवता याव्यात म्हणून व संस्थेच्या सेवकांनाही सभासद होता यावे म्हणून |
| ३९ (ब) | नवीन | सभासदाला पूर्वी दिलेल्या कर्जापैकी अर्धे कर्ज फेड झाल्यास नवीन कर्ज मिळेल व त्या कर्जातून पूर्वीची कर्जबाकी रक्कम वजा करून उरलेली रक्कम दिली जाईल. मात्र वर्षातून एकदाच कर्ज दिले जाईल. | सभासदांना कर्ज घेण्यास सोय म्हणून. |
| ३९ (क) | नवीन | अल्प कर्ज : संस्थेच्या उद्देशास अनुसरून संस्था सभासदांना माल पुरविण्यासाठी दुकान चालवील व अशा दुकानातून रुपये ५००।– पर्यंत माल सभासदांना उधारीने देण्यात येईल. त्याची परतफेड ५ (पाच) समान | सभासदांची अल्प कर्जाची सोय व्हावी म्हणून |

| | | | |
|---|---|---|---|
| | | हप्त्यात केली जाईल. सदर कर्जावर नेहमीच्या व्याज दरानें व्याजाची आकारणी केली जाईल. सदरचे कर्ज मिळण्यासाठी सभासदाने, संस्थेने विहित केलेला नमुना अर्ज भरून त्यावर संबंधित कार्यालय प्रमुखाची सही घेऊन संस्थेस सादर केला पाहिजे. संस्थेतून सेक्रेटरीच्या सहीने दिलेल्या पत-पावतीवर सदर सभासदास दुकानातून माल मिळेल. | |
| ३९ (ड) | नवीन | संस्थेच्या कायम सेवकांनाही कर्ज देता येईल. | संस्थेच्या सेवकांच्या आर्थिक अडचणी भागविण्यासाठी |
| | सोसायटीचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत. 'सोसायटीच्या सभासदांमध्ये काटकसरीला, बचतीला आणि सहकार्याला उत्तेजन देणें. बचत केलेल्या भांडवलातून त्यावर वाजवी लाभांश देता येईल अशा रीतीने गरजू सभासदांना कर्जपुरवठा करणे. | उद्देश : सोसायटीचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत, 'सोसायटीच्या सभासदांमध्ये काटकसरीला, बचतीला आणि सहकार्याला उत्तेजन देणे. बचत केलेल्या भांडवलातून त्यावर वाजवी लाभांश देता येईल, अशा रीतीनें गरजू सभासदांना कर्जपुरवठा करणे. तसेच सभासदांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी दुकाने व कामकाजासाठी शाखा काढता येतील. | संस्थेच्या उद्देशाला अनुसरून तरतूद करण्यात आली आहे |
| ५० (अ) | नवीन | रिकरिंग डिपॉझिट स्कीम : प्रत्येक सभासदाकडून द. म. १० रु. प्रमाणे आवर्तक (रिकरिंग) ठेव ५ वर्षे मुदतीसाठी सुरू करण्यात येईल. सदर ठेवीवर रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार व्याज देण्यात येईल. | सभासदांना बचतीला प्रोत्साहन मिळावे म्हणून |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ (१) | कोणाही सेवकास खालील पात्रतेशिवाय सभासद होता येणार नाही.<br>१. तो पोलीस खात्यातील खालीलपैकी कोणत्याही विभागात कायम स्वरुपाची अथवा एक वर्षाहून अधिक काळ हंगामी नोकरी करीत असला पाहिजे.<br>अ. पोलीस आयुक्तालय, पुणे शहर.<br>ब. विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हा अन्वषण विभाग पुणें, यांचे कार्यालय, पुणे.<br>संचालक पोलीस बिनतारी संदेश व पोलीस उपमहानिरीक्षक महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय पुणे.<br>ड. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण पुणे, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य पुणे, लाचलुचपत प्रतिबंधक व दारुबंदी विभाग व सहकार कक्ष पुणे व राज्य वहातुक शाखा यांची कार्यालयें, पुणे.<br>इ. एस. आय. बी. पुणे | सभासदत्व।<br>(अ) पोलीस खात्यातील कार्यालयाच्या आस्थापनेवरील खालील व्यक्तीस संस्थेचे सभासद होता येईल.<br>१. पोलीस आयुक्तालय, पुणे शहर.<br>२. विशेष पोलीस महानिरीक्षक, (गुन्हे अन्वेषण). पुणे विभाग.<br>३. संचालक, पोलीस बि. सं. व पोलीस उपमहानिरीक्षक, पुणे विभाग.<br>४. पो. अ., पुणे ग्रामीण भाग.<br>५. पो. अ., मो. प., म. रा. पुणे यांचे कार्यालय,<br>६. पो. अ. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.<br>७. पो. अ. राज्य वहातुक शाखा, पुणे.<br>८. पो. उप अधी., सें. इ. ब्युरो ऑफिस, पुणे ४.<br>९. पो. उप अधी., ए. सी. अँड पी. आय. ब्रँच, पुणे १.<br>१०. समादेशक, बल गट क्र. १, २ पुणे; ५, ७ दौंड. | समादेशक बल गट क्र. १, २, ५ व ७ यांनाही सभासदत्व मिळावे म्हणून. |

रा. सो. शिर्के
सेक्रेटरी

ज्ञा. मा. झुरंगे
व्हा. चेअरमन

ए. बी. कारखानीस
चेअरमन

| | | | |
|---|---|---|---|
| | | हप्त्यात केली जाईल. सदर कर्जावर नेहमीच्या व्याज दरानें व्याजाची आकारणी केली जाईल. सदरचें कर्ज मिळण्यासाठी सभासदाने, संस्थेने विहित केलेला नमुना अर्ज भरून त्यावर संबंधित कार्यालय प्रमुखाची सही घेऊन संस्थेस सादर केला पाहिजे. संस्थेतून सेक्रेटरीच्या सहीने दिलेल्या पत-पावतीवर सदर सभासदास दुकानातून माल मिळेल. | |
| ३९ (ड) | नवीन | संस्थेच्या कायम सेवकांनाही कर्ज देता येईल. | संस्थेच्या सेवकांच्या आर्थिक अडचणी भागविण्यासाठी |
| | **सोसायटीचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत. 'सोसायटीच्या सभासदांमध्ये काटकसरीला, बचतीला आणि सहकार्याला उत्तेजन देणें. बचत केलेल्या भांडवलातून त्यावर वाजवी लाभांश देता येईल अशा रीतीने गरजू सभासदांना कर्जपुरवठा करणे.** | उद्देश : सोसायटीचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत, 'सोसायटीच्या सभासदांमध्ये काटकसरीला, बचतीला आणि सहकार्याला उत्तेजन देणे. बचत केलेल्या भांडवलातून त्यावर वाजवी लाभांश देता येईल, अशा रीतीनें गरजू सभासदांना कर्जपुरवठा करणे. तसेच सभासदांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी दुकाने व कामकाजासाठी शाखा काढता येतील. | संस्थेच्या उद्देशाला अनुसरून तरतूद करण्यात आली आहे |
| ५० (अ) | नवीन | रिकरिंग डिपॉझिट स्कीम : प्रत्येक सभासदाकडून द. म. १० रु. प्रमाणे आवर्तक (रिकरिंग) ठेव ५ वर्षे मुदतीसाठी सुरू करण्यात येईल. सदर ठेवीवर रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार व्याज देण्यात येईल. | सभासदांना बचतीला प्रोत्साहन मिळावे म्हणून |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ (१) | कोणाही सेवकास खालील पात्रतेशिवाय सभासद होता येणार नाही.<br>१. तो पोलीस खात्यातील खालीलपैकी कोणत्याही विभागात कायम स्वरूपाची अथवा एक वर्षाहून अधिक काळ हंगामी नोकरी करीत असला पाहिजे.<br>अ. पोलीस आयुक्तालय, पुणे शहर.<br>ब. विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हा अन्वषण विभाग पुणें, यांचे कार्यालय, पुणे.<br>संचालक पोलीस बिनतारी संदेश व पोलीस उपमहानिरीक्षक महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय पुणे.<br>ड. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण पुणे, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य पुणे, लाचलुचपत प्रतिबंधक व दारुबंदी विभाग व सहकार कक्ष पुणे व राज्य वहातुक शाखा यांची कार्यालयें, पुणे.<br>इ. एस. आय. बी. पुणे | सभासदत्व ।<br>(अ) पोलीस खात्यातील कार्यालयाच्या आस्थापनेवरील खालील व्यक्तीस संस्थेचे सभासद होता येईल.<br>१. पोलीस आयुक्तालय, पुणे शहर.<br>२. विशेष पोलीस महानिरीक्षक, ( गुन्हे अन्वेषण ). पुणे विभाग.<br>३. संचालक, पोलीस बि. सं. व पोलीस उपमहानिरीक्षक, पुणे विभाग.<br>४. पो. अ., पुणे ग्रामीण भाग.<br>५. पो. अ., मो. प., म. रा. पुणे यांचे कार्यालय,<br>६. पो. अ. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.<br>७. पो. अ. राज्य वहातुक शाखा, पुणे.<br>८. पो. उप अधी., सें. इ. ब्युरो ऑफिस, पुणे ४.<br>९. पो. उप अधी., ए. सी. अँड पी. आय. ब्रँच, पुणे १.<br>१०. समादेशक, बल गट क्र. १, २ पुणे; ५, ७ दौंड. | समादेशक बल गट क्र. १, २, ५ व ७ यांनाही सभासदत्व मिळावे म्हणून. |

**रा. सो. शिर्के**
सेक्रेटरी

**ज्ञा. मा. झुरंगे**
व्हा. चेअरमन

**ए. बी. कारखानीस**
चेअरमन

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., पुणे १. 

## सन १९७९-८० ते १९८७-८८ या कलावधीचा तुलनात्मक तक्ता.

| तपशील | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ | १९८६-८७ | १९८७-८८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सभासद संख्या | २,३८२ | २,२२९ | २,६२२ | २,६६१ | ३,०१५ | ३,५३० | ४,३६० | ५,२२४ | ५,७७५ |
| भाग भांडवल | १०,३१,३५० | १५,३८,०५० | १८,८८,४३८ | २३,६४,१९० | २८,८१,६३४ | ३५,०९,४८६ | ४७,५७,०९० | ७३,१२,३२० | १,१२,७९,९९० |
| निधी | ८७,३७९ | १,०१,७०९ | १,१३,८३५ | १,४८,८४५ | १,९०,८५७ | २,६०,३५५ | ३,८०,८६३ | ५,४९,१२९ | ८,६८,४५६ |
| कॅश क्रेडिट कर्ज | ——— | ——— | ——— | १,८६,६५५ | ५८,५७५ | १३,३५,९९६ | ३९,४२,८९२ | ६४,३५,८६७ | ८८,९९,३४८ |
| ओव्हरड्राफ्ट | ३४,३२९ | २,८०४ | ३,३७,३०३ | ४,९५,६५२ | ८१,९३६ | २,३५,९५१ | १४५,५७० | ८१,५६५ | ५१,३७३ |
| सभासद ठेवी | १,४५,५०० | २,०९,७०० | २,११,४०० | १,९१,२०० | १,७५,००० | १,२७,००० | १,४३,२६० | ३,०२,५३९ | ५,०९,४३५ |
| गुंतवणुक | १,१७,००० | २,६५,००० | ७,००,००० | ७,५२,२५० | ८,३१,००० | ७,५५,६०० | ११,३७,२०० | १५,६०,००० | २२,४५,००० |
| सभासद कर्जे | ११,६६,३७५ | १४,५०,४१० | १८,१३,३६० | २५,८५,१७५ | २६,३४,५४८ | ५०,७४,०१३ | ८६,३३,५६५ | १,३८,३१४४५ | २,०४,९५,४७५ |
| थकबाकी | ८,८४० | १४,३६० | ३४,०९० | २१,३२० | १८,२०३ | २६,४६८ | ४१,२५५ | ५९,१२५ | ९९,८७५ |
| निव्वळ नफा | ५०,७८६ | ८९,१४५ | १,१३,८२१ | १,८८,३५३ | २,१२,९११ | ३,६२,७३९ | ४,८७,२६५ | ८,०९,१६० | १३,६५,३०४ |
| लाभांशाची रक्कम | ३६,०९७ | ७१,९०२ | ८५,००० | ९४,४२२ | १,५७,४९२ | २,४६,३३३ | ३,३४,१२५ | ५,४१,४७१ | ८,५०,४०० |
| लाभांशाची टक्केवारी | ३॥ टक्कें | ५ टक्के | ५ टक्कें | ५ टक्के | ७ टक्के | ९ टक्के | १० टक्के | १२ टक्के | १२ टक्के नियोजित |
| ऑडिट वर्ग | 'अ' | 'अ' | 'अ' | 'अ' | 'अ' | 'अ' | 'अ' | 'अ' | तपासणी होणे आहे |

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड द्वारा-पोलीस आयुक्त कार्यालय पुणे-४११००१. 

## अंदाज पत्रक १९८७-८८

खर्च | उत्पन्न

| खर्च तपशील | सन १९८७-८८ अंदाज | सन १९८७-८८ प्रत्यक्ष खर्च | सन १९८८-८९ अंदाज | उत्पन्न तपशील | सन १९८७-८८ अंदाज | सन १९८७-८८ चे प्रत्यक्ष उत्पन्न | सन १९८८-८९ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सेवक मुदत ठेव व्याज | ५,०००-०० | ३,४६५-२२ | ४०००-०० | सभासद कर्जावरील व्याज | २५,००,०००-०० | २५,२३,५१८-४५ | ३५,००,०००-०० |
| सभासद मुदत ठेव व्याज | ४०,०००-०० | ४८०८९-११ | ६००००-०० | बँक ठेवीवरील व्याज | ७५,०००-०० | ८०,२५२-९५ | १,००,०००-०० |
| बँक ओ. ड्रॉफ्ट कर्जावरील व्याज | १०,०००-०० | ७,७५८-५५ | १००००-०० | मुदत ठेव तारण कर्ज व्याज | ५००-०० | १,९०२-७० | ३,०००-०० |
| बँक कॅश क्रेडिट कर्जावरील व्याज | ११,००,०००-०० | ९,२६,५४९-१७ | १५,००,०००-०० | बँक शेअर्संवरील लाभाश | ५६,०००-०० | ५५,६४४-७५ | १,२५,०००-०० |
| सेवक भविष्य निधीवरील व्याअ | ४,०००-०० | ४३५५-२३ | ५०००-०० | इतर उत्पन्न (दाखला फी) | ३००-०० | ३७०-०० | ५००-०० |
| सेवक पगार व भत्ते | १,६०,०००-०० | १७४२९९-०० | २,००,०००-०० | फॉर्मस विक्री | ९,०००-०० | ७,६४६-०० | १०,०००-०० |
| सेवकांना बोनस | २५,०००-०० | २५०४३-०० | ३०,०००-०० | बँक सेंव्हिंगजवरील व्याज | | १०१-१० | १००-०० |
| हिशोब तपासणी फी | १०,०००-०० | १०५००-०० | १५,०००-०० | सेंवक तारण कर्जावरील व्याज | | १९८-७४ | २००-०० |
| सहकार शिक्षण निधी | ५००-०० | ५००-०० | ५००-०० | | | | |
| सेंवक भविष्य निधी वर्गणी | ५,०००-०० | ४९९३-०० | ६०००-०० | | | | |
| सोसायटी व्यवसाय कर | १५०-०० | १५०-०० | २५०-०० | | | | |
| सेवक ग्रॅच्युइटी निधी | ५,०००-०० | १००००-०० | १०,०००-०० | | | | |
| फर्निचर व डेडस्टॉक | ४,०००-०० | ३३१६-७९ | १०,०००-०० | | | | |
| संशयित बुडीत कर्ज निधी | ५,०००-०० | – | १०,०००-०० | | | | |
| थकबाकी व्याज तरतूद | १५,०००-०० | २९२३०-०० | २०,०००-०० | | | | |
| कार्यकारिणी सभासद सभा भत्ता | ५,०००-०० | ६९७५-०० | ७,५००-०० | | | | |
| फॉर्मस छपाई व स्टेंशनरी | १५,०००-०० | १२४८५-१५ | १५,०००-०० | | | | |
| टपाल व खर्च | ३,०००-०० | ४३०३-०० | ५०००-०० | | | | |
| तसलमात खर्च | ९,०००-०० | ६१०५-२० | १००००-०० | | | | |
| मेहेनताना खर्च | १,५००-०० | २३२६-२० | ३०००-०० | | | | |
| बँक कमिशन | ५०-०० | – | १००-०० | | | | |
| सानुग्रह अनुदान | ५,०००-०० | – | ५०००-०० | | | | |
| जाहिरात खर्च | ५००-०० | १४९०-०० | १५००-०० | | | | |
| निवडणूक खर्च | १०,०००-०० | २१९८७-१० | – | | | | |
| एकूण खर्च रुपये | १४,३७,७००-०० | १३०४३३०-७२ | १९,२७,८५०-०० | | | | |
| निव्वळ नफा रुपये | १२,०३,१००-०० | १३६५३०३-९७ | १८,१०,९५०-०० | | २६,४०,८००-०० | २६,६९,६३४-६९ | ३७,३८,८००-०० |
| एकूण रुपये | २६,४०,८००-०० | २६६९६३४-६९ | ३७,३८,८००-०० | | | | |

रा. सो. शिर्के, सेक्रेटरी    ज्ञा. मा. झुरुंगे, व्हा. चेअरमन    ए. बी. कारखानीस, चेअरमन

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. (२०

द्वारा-पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे-४११००१

### कारणपरत्वे थकबाकीचा तपशील

| अनु-क्रमांक | थकबाकीचे कारण | थकीत सभासद संख्या | थकबाकीची रक्कम | |
|---|---|---|---|---|
| | | | मुद्दल रुपये | व्याज रुपये |
| १ | बाहेर जिल्ह्यात बदली | २५ | ३८,५२५ | १०,६१० |
| २ | पगार तहकुबीमुळे | १६ | ३१,१०० | ८,२३२ |
| ३ | सेवानिवृत्तीमुळे | ५ | ६,६५० | २,५३९ |
| ४ | सभासदांच्या मृत्यूमुळें | ७ | १२,२०० | ३,४१५ |
| ५ | वडतर्फीमुळे | ७ | ११,४०० | ४,४३४ |
| | एकूण-- | ६० | ९९,८७५ | २,९२३० |

### तसलमात खर्च खात्याचा तपशील

| अ. नं. | तपशील | रुपये पैसे |
|---|---|---|
| १ | सभा खर्च-(कार्यकारी मंडळ व वार्षिक सर्वसाधारण सभा) | ३०३८-९५ |
| २ | मेहनताना खर्च- | १५५-०० |
| ३ | पाहुण्यांसाठीं खर्च- (ऑडिटर, बँक अधिकारी इ.) | १०७८-३० |
| ४ | प्रवास खर्च | १२६४-५५ |
| ५ | ऑफिस सफाई व इतर | ५६८-४० |
| | एकूण रु. | ६१०५-२० |

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. पुणे १.

माहे जून १९८८ अखेर शेअर्स जमा व कर्जबाकी पत्रक.

| सभासद नंबर | ३०-६-८७ अखेर पर्यंतची जमा रक्कम | ८७-८८ सालातील जमा रक्कम | सभासद झाल्यापासून एकूण जमा शेअर्स रक्कम | ३०-६-८८ ची कर्जबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ |
| | २३८० | ६६० | ३०५० | ५५०० |

टीप-वरील पत्रकाबाबत कोणास काही शंका वगैरे असल्यास त्यांनी इकडे एक महिन्याच्या आत कृपया संपर्क साधावा.

ए. बी. कारखानीस
चेअरमन

### -- मुदत ठेव व्याजाचे दर --

(१) ६ महिने ते ११ महिने द. सा. द. शे. -- ९॥ टक्के
(२) १२ महिने ते २३ महिने ,, ,, -- १०॥ ,,
(३) २४ ,, ते ३५ ,, ,, ,, -- ११ ,,
(४) ३६ ,, ते ४७ ,, ,, ,, -- ११॥ ,,
(५) ४८ म. ते ५९ म. द. सा. द. शे. -- १२ ,,
(६) ६० ,, ते पुढील कालावधी ,, -- १३ ,,

### -- दामदुप्पट योजना --

कालावधी ६६ महिने

### -- सभासदांना सूचना --

(१) सभासदांनी संपूर्ण कर्ज अर्ज व्यवस्थित भरून संस्थेत पाठवावा.

(२) सोसायटीची मासिक सभा काही अडचण न आल्यास साधारणतः महिन्याच्या २० तारखेस होते. कर्ज घेणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज मिटींगपूर्वी ३ दिवस अगोदर पाठवावेत.

(३) कर्ज मंजुरीचे चेक्स साधारणतः १ तारखेनंतर आदा करण्यात येतात व सदरचे चेक्स लवकरात लवकर घेऊन जावेत.

(४) सभासदांनी कर्ज फेडीची पात्रता लक्षात घेऊन कर्जाची मागणी करावी म्हणजे थकबाकी किंवा आर्थिक अडचण उद्भवणार नाही.

(५) सभासदाची खात्यात ३ वर्षे नोकरी झाल्याशिवाय कर्ज देता येत नाही. कृपया सभासदांनी ३ वर्षे सेवेपूर्वी कर्जाचा आग्रह धरू नये.

सरस्वती मुद्रण मंदीर,
भवानी पेठ, पुणे ४२.

**BOOK · POST**

सभासद नंबर ७४१५

खाते नंबर ६४२

प्रति

श्री. / ~~श्री~~मती विश्वनाथ सखाराम शिन्दे.

रू० नं० ३०१, शिवाजीनगर पोलीस कॅन्टीन,

लाईन,

जिल्हा पुणे — ५

प्रेषक —
चेअरमन
दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप.
क्रेडिट सोसायटी लि.
द्वारा—पोलीस आयुक्त कार्यालय,
पुणे-४११००१